**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीत डिजिटल विकासाच्या भारतीय मॉडेलवर दावोस मध्ये आज चर्चा.
2. पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसायाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी संशोधकांचे योगदान व नवतंत्रज्ञानाचा अधिक वापर महत्वाचा - पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे नागपूरच्या जागतिक परिषदेत प्रतिपादन.
3. अकोला जिल्ह्यातील 236 ग्रामपंचायतींची टीबीमुक्तीकडे वाटचाल.
4. महाराष्ट्रातल्या कर्णधारांच्या नेतृत्वाखाली पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिलाआणि पुरुष संघ अजिंक्य.

-----------------------------

**दावोस**

स्विझर्लंडमधल्या दावोस इथं आजपासून जागतिक आर्थिक मंचाच्या गुंतवणूक परिषदेला सुरुवात होत आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या नेतृत्वाखाली एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ या परिषदेत भारताचं प्रतिनिधित्व करत आहे. बुद्धिमान युगासाठी सहकार्य या संकल्पनेखाली दावोस गुंतवणूक परिषद होत असून, या परिषदेत ६५ हून अधिक भारतीय व्यावसायिक देखील सहभागी झाले आहेत. २४ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या परिषदेत भारताची उल्लेखनीय प्रगती तसंच भारताचं विकासाचं मॉडेल त्याचबरोबर समावेशक विकास आणि डिजिटल परिवर्तनासाठी भारताचा दृष्टिकोन भारतीय शिष्टमंडळ अधोरेखित करेल. या परिषदेत सहभागी होऊन, भागीदारी मजबूत करणं, गुंतवणूक आकर्षित करणं, तसंच शाश्वत विकास आणि तंत्रविषयक नवोन्मेशामध्ये अग्रगण्य देश म्हणून, आपली प्रतिमा जगासमोर आणण्याचा भारताचा उद्देश आहे.महाराष्ट्रात गुंतवणूक आणण्याच्या दृष्टीनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उद्योगमंत्री उदय सामंत, तसंच एमआयडीसी, एमएमआरडीए, सिडकोच्या अधिकाऱ्यांचं शिष्टमंडळ या परिषदेत सहभागी झालं आहे. मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यात गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याच्या दृष्टीनं भरगच्च कार्यक्रमांचं नियोजन करण्यात आलं असून, मुख्यमंत्री अनेक जागतिक नेत्यांच्या भेटी घेणार आहेत. डेटा सेंटर्स, सेमिकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहने, इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधी आणि

पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रात मोठ्या संख्येनं सामंजस्य करार या दौऱ्यात अपेक्षित आहेत. या परिषदे दरम्यान, राज्यात मोठी गुंतवणूक येईल, असा विश्वास, मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

-----------------------------

न्यूट्रिशन कॉन्फरन्स

ग्रामीण भागाला सावरणाऱ्या शेतीपुरक पशु-पक्षी पालन, मत्स्यव्यवसाय उद्योगाला भविष्यात जर अधिक शाश्वत करायचे असेल तर हवामान बदलाचा विचार करुन प्राण्यांच्या पोषक अन्नद्रव्याचे काटेकोर नियोजन करणे नितांत आवश्यक आहे. याचबरोबर ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना अन्न सुरक्षिततेसह शेतीपुरक उद्योग व्यवसायातून चांगल्या उत्पन्नाची संसाधने अधिक भक्कम करण्यासाठी संशोधकांनी पुढे यावे असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाअंतर्गत आयोजित जागतिक पशु आहार शास्त्र परिषदेच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या.

*पशुधन कमी आणि खाण्याऱ्यांची संख्या जास्त आहे. न्यूट्रिशनच्या अवेअरनेसमुळे लोक आता फार चूसी झालेले आहेत. तसेच आपण शेतकऱ्यांना सांगतो की चांगल्या बियाणे वापरा कमी जमिनींमध्ये चांगल बियाणं वापरून, कमी पाणी वापरून, कमी खत वापरून, कमी रसायन वापरून, भरपूर इल्ड करा आणि मला असं वाटतं की This department so important that we are taking care of the nutrition of whole globe. This is a very globally connected department.*

उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीत वाढत्या लोकसंख्येला पुरेल एवढे दुध, मांस, अंडी उपलब्ध व्हावेत, यातील पोषण मुलद्रव्य वाढण्यासह पर्यावरणातील संतुलनही राखले जावे यादृष्टीने आयोजित जागतिक पशु आहार शास्त्र परिषद महत्वाची आहे. या निमित्ताने आपण सर्व संशोधक एकत्र येऊन या क्षेत्राला नवी दिशा द्याल याची खात्री असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितले. संपूर्ण जगामध्ये भारत देशात सर्वात जास्त दूध उत्पादन होते तर महाराष्ट्र हा दूध उत्पादनामध्ये सातव्या क्रमांकावर आहे ग्रामीण भागामध्ये कमी जागेत हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पशुखाद्य तसेच चारा निर्मितीसाठी प्रशिक्षण देणे आवश्यक असून या तीन दिवसीय परिषदेतून व्यावहारिक उपाय सुचवले जातील असे देखील मुंडे यांनी यावेळी सुचवलं. या परिषदेला भारतीय कृषी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. हिमांशू पाठक, माफसू नागपूरचे कुलगुरू डॉ.एम.व्ही.पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.

-----------------------------

**विधी सेवा महाशिबिर**

**समाज सशक्त झाला तर देश सशक्त होईल, यासाठी समाजाला सशक्त करण्यासाठी तळागातील शोषित, वंचित, दुर्बल, गरीबांना मुख्य प्रवाहात आणन्यासाठी त्यांची आर्थिक उन्नती होणे आवश्यक आहे. याकरीता शासन राबवित असलेल्या विविध योजनेच्या लाभासोबतच न्याय मिळवून देण्यासाठी न्याय व प्रशासनांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर तथा वर्धा जिल्हयातील पालक न्यायमुर्ती उर्मिला जोशी-फलके यांनी विधी सेवा महाशिबिराच्या उद्घाटन प्रसंगी केले. वर्धा इथल्या विकास भवन येथे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वर्धा जिल्हाधिकारी कार्यालय व वकील संघ वर्धाच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश संजय भारुका होते. न्यायाधिश भारुका यांनी अध्यक्षिय भाषणातून सुचवले कि...**

***सेवा महाशिबीर हे शासनाच्या ज्या अनेक योजना आहेत. त्या जनसामान्यांपर्यंत तळांगळ्याच्या लोकांपर्यंत पोहोचत नाहीत आणि म्हणूनच माननीय सर्वोच्च न्यायालय मान्य उच्च न्यायालय मुंबई यांनी न्यायालय मार्फत या बाबी कशा सगळ्यांपर्यंत पोहोचतील अशी ही योजना आखली होती आणि म्हणून विधी सेवा महाशिबीराचा कार्यक्रम आपण आयोजित केला होता.***

**-----------------------------**

**टीबीमुक्तीकडे वाटचाल**

**अकोला जिल्हयात** 236 **ग्रामपंचायतींची टीबीमुक्तीकडे वाटचाल होत आहे. क्षयरूग्णांचे प्रमाण व मृत्यू शून्यावर आणण्यासाठी शोध मोहिम व उपचारांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज दिले. जिल्हा टीबी फोरमची बैठक जिल्हाधिका-यांच्या दालनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. क्षयरोग निर्मूलन मोहिमेत टीबीमुक्त ग्रामपंचायतींना पुरस्कार दिला जातो. अकोला जिल्हयातील सर्व गावे टीबीमुक्त करण्याचे ध्येय ठेवून मोहिमेला गती द्यावी. प्रौढांचे बीसीजी लसीकरण ऐच्छिक आहे. तथापि,** 75 **हजारहून अधिक व्यक्तींनी पूर्वनोंदणी केली आहे. त्यात सध्या** 34 **टक्के लसीकरण झाले आहे. हे काम पूर्ण करण्याचे निर्देश कुंभार यांनी दिले.**

**-----------------------------**

**राहुल नार्वेकर**

**विधीमंडळाद्वारे देशातल्या नागरिकांची सेवा करण्याचीमहत्त्वाची जबाबदारी पीठासीन अधिकाऱ्यांवर आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी**

केलं.पाटण्यात सुरू झालेल्या ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते आज बोलत होते. विधीमंडळात होणारे गोंधळ आणित्यांचं पावित्र्य जपा. संविधानानं घालून दिलेल्या मूल्यांच्या आधारे नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. लोकसभा, राज्यसभेसह देशाच्या विविध भागातून आलेले विधीमंडळांचे अध्यक्ष आणि इतर अधिकारी यात सहभागी झाले आहेत. याविषयी आकाशवाणीशी बोलताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले...

*अशा संमेलनातूनच संसदीय लोकशाहीला बळकट करण्याचा अधिक पाठबळ हे पीठासीन अधिकारीला प्राप्त होतो त्याबद्दल सर्वांना मनापासून शुभेच्छा.*

संविधानाच्या अंमलबजावणीला ७५वर्ष होत असताना संसदआणि राज्य विधीमंडळांचं संविधानाच्या बळकटीतलं योगदान यावर या संमेलनात विशेष चर्चा होणार आहे.

-----------------------------

खो-खो विश्वचषक

भारताच्या महिला आणि पुरुष संघानं पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद पटकावलं आहे. काल रात्री झालेल्या दोन्ही सामन्यात भारतीय संघांनी वेग, रणनिती आणि कौशल्याचं उत्तम प्रदर्शन केलं. भारतीय पुरुष संघाने नेपाळला ५४-३६ असं नमवत विश्वचषकावर नाव कोरलं तर महिला संघानं नेपाळच्या महिला संघाला ७८-४० अशी मोठ्या फरकानं मात दिली. नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी इनडोर स्टेडियमवर झालेल्या या सामन्यांमध्ये भारतानं पहिल्यापासूनच निर्विवाद वर्चस्व गाजवलं आणि नेपाळला रोखून धरलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दोन्ही संघांचं अभिनंदन केलं आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील भारतीय संघांच अभिनंदन केलं आहे.

-----------------------------

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विदर्भ प्रदेशचे 53वे प्रदेश अधिवेशन येत्या, 28 ते 30 जानेवारी दरम्यान स्मृती मंदिर परिसर, रेशीमबाग मैदान नागपूर इथं होत आहे. या अधिवेशनाचे भूमिपूजन समारोह आज रेशीमबाग मैदान इथं सुप्रसिद्ध उद्योजक आशिष फडणवीस आणि व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.राजेंद्र काकडे यांच्या हस्ते पार पडले. हे अधिवेशन विदर्भ प्रदेशाच्या युवा तरूणाईला नवी उर्जा आणि दिशा देणारे ठरणार असून विदर्भातील 120 तालुके व 119 मोठ्या सेंटरमधील 550 महाविद्यालयातून 2000 विद्यार्थी प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी होणार आहेत. तब्बल 13 वर्षानंतर नागपुरात हे विदर्भ प्रांताचे अधिवेशन होत आहे.